सर्व शिक्षा अभियान
सारे शिकूया, पुढे जावूया.

## शैक्षणिक पार्श्वभूमी

अहमदनगर जिल्ह्याच्या शैक्षणिक चळवळीचा मागोवा घेत असताना भारताच्या शैक्षणिक चळवळीचा विचार करावा लागेल. प्राचीन भारतीय शिक्षण पद्धती गुरूकुल पद्धतीची होती. विद्यार्थी गुरूगृही जाऊन विद्यार्जन करीत असत.

मध्यंतरीच्या काळामध्ये नगर जिल्हयात यादवराजे, मोगल सम्राट, बहमनी राजवट, छत्रपतींचे हिंदवी स्वराज्य आणि पेशवाई यांची राजकीय सत्ता होती. परंतु या सर्वांनी शिक्षणास फारच कमी महत्व दिल्याचे इतिहासावरून दिसून येते. इ.स.१८१८ मध्ये ब्रिटीशांनी शनिवार वाड्यावरील भगवा झेंडा उतरवनु तेथे युनियन जॅक फडकवला व पर्यायने तेव्हापासनू अहमदनगर जिल्ह्यावरही इंग्रजांचे राज्य प्रस्थापित झाले.

१८२३ मध्ये मुंबई इलाख्यासाठी माऊंट स्टुअर्ट एल्फिंस्टन यांची गव्हर्नर म्हणन नियुक्ती झाली. एल्फिंस्टन हे मानवतावादी होते महाराष्ट्राच्या दौ-यावर असताना त्यांना कोठेही शाळा दृष्टीस पडली नाही म्हणून त्यांनी महाराष्ट्रामध्ये शिक्षणाचा पाया रोवला व महाराष्ट्रात शैक्षणिक चळवळ सुरू झाली.

एल्फिंस्टनच्या शाळेत महाराष्ट्रातील कानाकोप-यातुन आलेले सर्व विद्यार्थी शिकले. त्यांच्यावर एवढे चांगले संस्कार झालेल की त्यांनी आपापल्या भागात जाऊन शिक्षणाचा प्रचार व प्रसार करण्यास सुरवात केली. अशारीतीने अहमदनगर शहरात १८२३ क्लेरा ब्रुस हायस्कुल सुरू झाले.

न्यायमुर्ती महादेव गोविंद रानडे यांनी १८८३ पूर्वीच सोसायटी हायस्कुल सुरू केले. यानंतर अहमदनगर १९१६ च्या दरम्यान अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक मंडळाची पूर्व पिठीका तयार झाली. करवीर निवासी चौथे शिवाजी महाराज यांच्या स्मरणार्थ त्यांचे दत्तकपुत्र राजर्षी शाहु महाराज यांनी चौथे शिवाजी मराठा बोर्डींग सुरू करून आर्थिक सहाय्य केले व येथे शिकलेले रावसाहेब म्हस्के,बापुसाहेब भास्कर यांनी अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक मंडळाच्या माध्यमातुन शिक्षणाची गंगोत्री जिल्हाभर फिरवली. त्याच वेळी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी जिल्ह्यात रयत शिक्षण संस्थेच्या शाळा सुरू केल्या. १९४७ मध्ये भास्कर पांडूरंग हिवाळे यांनी ख्रिश्चन मिशनरीच्या सहाय्याने अहमदनगर कॉलेज सुरू केले.